# १. इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना

- सदरची योजना केंद्र शासन पुरस्कृत योजना असुन दिनांक १५ ऑगस्ट १९९५ पासून संपुर्ण महाराष्ट्रात कार्यान्वीत झालेली आहे जे लाभार्थी संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधील दारिद्रय रेषेखालील कुटंबाच्या यादीत नाव असलेल्या अपंग लाभार्थ्यापैंकी वय १८ ते ६५ वर्षापेक्षा कमी वयोगटातील परंतु ८० % पेक्षा जास्त अपंगत्व असलेले तसेच एक किंवा बहुअपंगत्व असलेले लाभार्थी या योजनेचा लाभ घेणेस पात्र राहतील.

# इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना

या योजनेत १८ ते ६५ वर्षाखालील दारिद्र्य रेषेतील यादीत नोंद असलेल्या व ८० टक्के अपंगत्व असलेल्या अपंग व्यक्ती या योजनेस पात्र आहेत.

केंद्र शासनाकडुन त्यांना मासिक रक्कम रुपये २००/- व या योजनेस पुरक असलेल्या राज्य शासनाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधुन लाभार्थ्यांना रक्कम रुपये ४००/- प्रतिमहा दिले जाते असे या योजनेतंर्गत लाभार्थ्यास रक्कम रुपये ६००/- प्रतिमाह निवृत्ती वेतन दिले जाते.

**पात्रतेचे निकष, अटी व शर्ती :-** अपंग व्यक्तीचे वय १८ - ६५ वर्षाखालील तसेच ८० टक्के अपंग स्त्री किंवा पुरुष कुटुंबाचे नांव ग्रामीण / शहरी भागाच्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत समाविष्ट असणे.

**आवश्यक कागदपत्रे-**

१. वयाचा दाखला,

२. रहिवास दाखला,

३. जिल्हा शल्यचिकत्सक यांचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र, अपंगत्व व दुर्धर आजाराबाबत जिल्हा चिकित्सक ( सिव्हील सर्जन ) / शासकीय रुग्णालयांच्या वैद्यकीय अधिक्षक यांचा दाखला. ,

४. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये नांव समाविष्ट असलेबाबतचा उतारा.